

UGC Approved

ISSN - No. 2319-9318

*Peer Reviewed International Research Journal*

# VIDYAWARTA

*Special Issue.*

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

## Arts,Commerce and Science College, Ashti

Tal.Ashti, Dist.Beed (MS)

Accredited by NAAC B++ Grade with 2.78 CGPA,
ISO 9001:2015, Green Audited College



**Interdisciplinary National Conference on**

## Recent Trends in Social Sciences & Commerce

27th February 2018

## PUBLIC ADMINISTRATION & POLITICAL SCIENCE

Organizer
Dr. S. R. Nimbore
Principal

| | | | |
|---|---|---|---|
| 73 | सार्क संघटना आणि भारताचे परराष्ट्र धोरण | प्रा.डॉ. भुजंग विठ्ठलराव पाटील | 257 |
| 74 | महिला सबलीकरणात भारत सरकारचे योगदान | डॉ.रेखा रामनाथ बने | 260 |
| 75 | ग्रामराज्य, ग्रामसभा यांविषयीचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टीकोन | प्रा.तेजस्विता अविनाश रणश्रृंगारे | 262 |
| 76 | ग्रामराज्य, ग्रामसभा यांविषयीचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टीकोन | प्रा.किरण नामदेव गायकवाड | 265 |
| 77 | भारताचे सद्य:स्थिती मधील परराष्ट्र धोरण | डॉ. संजय गव्हाणे<br>रासवे बालासाहेब मच्छिंद्र | 267 |
| 78 | महिला सबलीकरण घटनात्मक तरतुदी व कायदे | प्रा.एस.के.तांदळे | 270 |
| 79 | मानवी हक्क आणि भारतीय संविधान | प्रा.डॉ. अर्जुन उबाळे | 273 |
| 80 | भारताचे परराष्ट्र धोरण आणि संबंध | प्रा. गजानन हनवते | 278 |
| 81 | मानवी हक्काचे प्रकार, मानवी हक्क संकल्पना | प्रा. खेडकर व्ही.एल.<br>डॉ. हजारे ए. पी. | 281 |
| 82 | महिला सबलीकरण | प्रा.उत्तम सोनवणे | 285 |
| 83 | भार तीय पंचायतर ाज व्यवस्था | प्रा. कमलाकर शर द इंगळे | 289 |
| 84 | भारताचे पूर्वेकडील परराष्ट्र धोरण | प्रा. आर. ई. भारुडकर | 292 |
| 85 | महिला शिक्षण विषयक धोरण आणि महिला सबलीकरण | कु.ऋतुजा पांडूरंग बावचकर | 296 |
| 86 | आधुनिक भारतासमोरील प्रादेशिक आव्हान | आकाश शेषराव बांगर | 299 |
| 87 | भारतातील पंचायतराजचे बदलते स्वरूप | डॉ.संजय गव्हाणे<br>जाधव श्रीराम दामला | 303 |
| 88 | महिला सबलीकरण : वास्तव आणि समस्य | परतवाघ मोहन भानुदास | 305 |
| 89 | मानवी हक्क | महेश वसंत कुलकर्णी | 309 |
| 90 | भारतातील मानवी हक्क आणि वास्तव परिस्थिती | श्री.नरवाडे बालाजी मारोतराव | 312 |
| 91 | मानव अधिकाराची सामाजिक उपयोगिता | डॉ. बालासाहेब माणिकराव टकले | 316 |
| 92 | भारत व शेजारील राष्ट्रांचे संबंध | पवार विश्वनाथ हणमंतराव | 319 |
| 93 | India and China Relation and Balancing Strategy : An analysis | Mr. Nikam Rajaram Digambar | 321 |
| 94 | भारतीय राजकारणातील बदलते प्रवाह | राजरत्न शं. गवई | 323 |
| 95 | महिला सबलीकरण : धर्म व समान नागरी कायदा | सुनिल दामोधर भारोडकर | 327 |
| 96 | संयुक्त राष्ट्र संघटनेतील भारताची भूमिका | खंडेराव हरिभाऊ काळे | 329 |
| 97 | भारताचे परराष्ट्रीय धोरण | प्रा. डॉ. जे.टी. कांबळे | 332 |

 ISSN - 2319 9318

# महिला शिक्षण विषयक धोरण आणि महिला सबलीकरण

**कु.ऋतुजा पांडूरंग बावचकर**
राजश्री शाहू महाविद्यालय,लातूर

प्राचीन काळापासून अगदी अलीकडच्या काळापर्यंत भारताच्या सांस्कृतीक इतिहासाचा मागोवा घेतला असता वेदकाळातील काही कालखंड वगळता स्त्रियांचा समाजातील दर्जा दुय्यम राहीला आहे.भारतीय लोकशाहीमध्ये जात,धर्म,लिंग अशा स्वरूपाचा भेदभाव न करता सर्व व्यक्ति समान आहेत,या तत्वाचा स्वीकार केलेला आहे.त्यानुसार स्त्री-पुरूष समान आहेत आणि आपणही तात्वीकदृष्टया भेदभाव अमान्य करत असलो तरी व्यावहारिक पातळीवर लिंगभेदभाव प्रवृत्तीला समाजात मोठया प्रमाणात वाव मिळाला.परिणामी देशाची ५० टक्के महिलांची लोकसंख्या आर्थिक,सामाजिक,शैक्षणिक हक्कापासून दूर राहिली,पर्यायाने विकासाच्या प्रक्रियेपासून वंचित राहिली.

भारतीय संस्कृतीत स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या दुय्यम दर्जाची,छळाची आणि स्त्री भ्रणहत्येची परंपरा असली तरी स्वातंत्र्यपूर्व काळातच देशातील अनेक समाज सुधारकांनी समाज परिवर्तन घडून आणले. “जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उदधारी” या उक्तीप्रमाणे जगाचा उद्धार करायचा असेल तर स्त्रि उद्धाराला दिले पाहिजे.मा.फुले,राजाराम मोहनरॉय,महर्षी कर्वे,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,मा.गांधी,पंडिता रमाबाई, सावित्रीबाई फुले अशा अनेक समाजसुधारकांनी अन्यायी,जाचक प्रथा परंपरा मोडीत काढून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या शिक्षणाची दालने खुली केली.

आज देशात प्रत्येक क्षेत्रात स्त्री पुरूषांच्या राजकारणात बरोबरीने कार्य करीत आहे.शास्त्रज्ञ,इंजीनियर्स, डॉक्टर्स,प्राध्यापक,बँक व्यवस्थापक,पोलीस अधिकारी वार्ताहार अशा अनेक महत्वाच्या पदावर महिलांनी आपले कर्तृत्व सिध्द केले आहे.शिक्षणाच्या आधारावर स्त्रियांनी केलेली ही प्रगती अभिमानास्पद आहे. महिलांचा समाजव्यवस्थेतील दुय्यम दर्जा संपुष्टात आणून त्यांना समानता व स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल अशी परिस्थिती प्राप्त करून देण्याच्या दृष्टिकोनातून अनेक स्त्रिवादी चळवळींनी महत्वाची भुमिका पार पाडली.परिणामी २० व्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्री सक्षमीकरणाच्या संकल्पनेला जागतिक स्वरूप प्राप्त झाले. दिवसेंदिवस स्त्रियांवर होणारे अन्याय,अत्याचार आणि तिच्या अधिकाराचे होणारे हनन लक्षात घेऊन, जागतिक स्तरावर त्याची नोंद घेण्यात आली. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने महिला सबलीकरणाला विशेष प्राधान्य देऊन महिला शिक्षणविषयक धोरणाचा आवलंब केला आणि उत्तम व निरोगी समाजाच्या जडणघडणीला प्राधान्य दिले.तेंव्हा प्रस्तुत शोधनिबंधात शासनाचे महिला शिक्षणविषयक धोरण जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**महिला सबलीकरण :-**

स्त्री सबलीकरण या शब्दाची विग्रह केल्यास सबलीकरण म्हणजे स्त्रीची दुर्बलता नष्ट करणारी संकल्पना आहे. सबलीकरण म्हणजे समाजातील दुय्यम दर्जाची वागणूक नष्ट करून स्त्री पुरूष समानतेचा स्वीकार करणे.स्त्रीयांना पुरूषाच्या बरोबरीने विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे महिला सबलीकरणाची संकल्पना सर्वप्रथम ब्राझीलच्या फावलो फेरे या शिक्षण तज्ञाच्या कल्पनेतून उदयास आली आहे.महिला सबलीकरणाच्या संकल्पनेत त्यांच्या आध्यात्मिक,राजनैतिक,सामाजिक आणि आर्थिक सामर्थ्यात वाढ करणे.त्यामुळे त्यांना शोषण प्राप्त होईल.त्या आपल्या स्वातंत्र्याचा पुरेपुर लाभ घेऊन दारिद्रय दूर करतील.लिंगभेदावर आधारित स्त्री पोषण नष्ट करून स्त्री-पुरूष समतेचा स्वीकार करणारी संकल्पना आहे.सर्वच क्षेत्रात समान संधी देऊन त्यांच्या बुध्दीमतेचा आणि कार्यक्षमतेचा वापर राष्ट्रविकासासाठी व स्त्रिविकासासाठी उपयुक्त ठरेल.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. महिला सबलीकरणाची संकल्पना समजून घेणे.
२. महिला सबलीकरणात शासनाच्या स्त्रिशिक्षण विषयक धोरणाच्या अभ्यास करणे.

**संशोधनाचे महत्व :-**

व्यक्तिच्या सर्वांगीण विकासात सर्वात महत्वाची भूमिका शिक्षणाची आहे. मा.गांधीजींच्या मते, व्यक्तीचा बौध्दीक आत्मीक व शारीरिक विकास शिक्षणामुळे होता. स्त्रिशिक्षणाची प्रत्यक्ष सुरूवात ही म.ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फूले या

ISSN - 2319 9318

दामपत्याच्या अथक प्रयत्नामुळे झाले.महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीकोनातून होत असलेल्या चौफेर प्रयत्नाला तेव्हाच महत्व प्राप्त होते.जेव्हा स्वत: महिलांमध्ये आपल्या अधिकारांची जाणीव होईल.आपल्या समाज व्यवस्थेमूळे व अंधश्रध्देमूळे आजही महिला सक्षमीकरणात अडथळे येत आहेत ते शिक्षणामुळे दूर होऊ शकतात.एकंदरित महिला सबलीकरणातील शिक्षणाचे महत्व आणि स्त्रियांना शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यात शासनाची भुमिक महत्वाची आहे.

**स्त्रिशिक्षण विषयक शासनाच्या योजना :-**

**१. शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य -**

अ. दुर्बल घटकांतील मुलींच्या पालकांना उपस्थिती भत्ता.

ब. अहिल्यादेवी होळकर मुलींना मोफत प्रवास योजना.

क. महिला सैनिक शाळा

ड. इ.१२ वी पर्यंतच्या मुलींना मोफत शिक्षणाची सोय.

**२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन -**

अ. सावित्रीबाई फुले कल्याण योजना. ब. शासकीय मुलींसाठी वसतिगृह बांधणे.

क. महिला महाविद्यालये ड. महिला विद्यापीठे

**३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन -**

अ. प्रियदर्शनी महिला वसतिगृहे. ब. व्यावसायिक प्रशिक्षण घेणाऱ्या महिलंना विद्यावेतन.

**४. सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्यक विभाग -**

अ. इ. ८ वी ते इ.१० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या मुलींकरीता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.

ब. आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलींकरिता शासकीय वसतिगृहे.

क. मागासवर्गीय मुलींकरिता शासकीय वसतिगृहे.

**५. जिल्हा परिषदेचे महिला व बाल विकास समिती -**

अ. शाळेत जाणाऱ्या मुलींना सायकली पुरविणे. ब. शाळेत जाणाऱ्या मुलींना गणवेश वाटप.

क. बालिका समृध्दी योजना

महाराष्ट्र शासनाने महिलाच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने वरील योजना सुरू करून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यामुळे महिलांच्या साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होत आहे. हे पुढील तक्त्यावरून दिसून येते.

**तक्ता क्र.१**

**भारतातील पुरूष व स्त्रीयांमधील साक्षरतेचे प्रमाण**

| जनगणना वर्ष | एकूण व्यक्ती | पुरूष | स्त्रीया | साक्षतरेची तफावत |
|---|---|---|---|---|
| १९७१ | ३४.४५ | ४५.९६ | २१.९७ | २३.९८ |
| १९८१ | ४३.५७ | ५६.३८ | २९.७६ | २६.६२ |
| १९९१ | ५२.२१ | ६४.१३ | ३९.२९ | २४.८४ |
| २००१ | ६४.८३ | ७५.२६ | ५३.६७ | २१.५९ |
| २०११ | ७४.०४ | ८२.१४ | ६५.४६ | १६.६८ |

**(संदर्भ-जनगनना अहवाल १९७१ ते २०११ )**

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की १९७१ च्या तुलनेत १९८१ मध्ये पुरूष व स्त्री साक्षरतेच्या प्रमाणामध्ये तफावत वाढत गेल्याचे आढळते.परंतु १९८१ नंतर ही तफावत कमी होत गेलेली आहे असे दिसते.१९८१ मध्ये असलेली ही तफावत २६.८२ टक्क्यावरून २०११ मध्ये१६.६८ टक्क्यावर आलेली दिसते. यावरून पुरूषांच्या तुलनेत स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण कमी असले तरी त्यामधील तफावत कमी होत आहे. महिला सबलीकरणाच्या दृष्टीने सुचिन्ह आहे.

एकंदरीत शासनाच्या या विविध योजनामूळे महिला साक्षरतेचे प्रमाण वाढले.शिक्षण घेऊन आत्मविश्वासाने जीवन जगणाऱ्या मुलींची संख्या वाढत आहे.आज असे कोणतेही क्षेत्र नाही, जिथे स्त्रियांनी आपल्या यशस्वीतेची पताका लावली नाही.

**संदर्भ सूची :**

१. गोटे शुभांगी-स्त्री परिवर्तनाची आव्हाने,साऊथ एशियन,सोशल रिसर्च पब्लिकेशन,औरंगाबाद-२००३.
२. दातार छाया-स्त्री पुरूष ग्रंथाली प्रकाशन,पूणे-१९८४.
३. योजना (हिंन्दी) जुन २०१२.
४. शिक्षण संक्रमण,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पूणे-२०१३.
५. लिमये अनुसया,स्त्रीचे समाजातील स्थान व भुमिका,समाजवादी महिला सभा,पूणे-१९९७.